# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९*
E-Mail: jtdirrom@gmail.com Web: www.jdteromumbai.com


**महत्वाचे व कालमर्यादित**
**परिपत्रक**

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०१५/1643
दिनांक : 04 JUN 2015

विषय : **तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई अंतर्गत असलेल्या व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील उपलब्ध सोयीसुविधा व इतर शैक्षणिक बाबींविषयक तपासणी करणेबाबत.**

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०१५/५७६ दि. १०.४.२०१५

उपरोक्त विषयासंदर्भात महाराष्ट्र विधीमंडळ सन २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान पुरवणी मागणीवरील कपात सुचनेच्या अनुषंगाने राज्यातील बहुतांश महाविद्यालयामध्ये वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, वसतीगृह, वाचनालय, पुरेसे शिक्षक इत्यादींसारख्या आवश्यक शैक्षणिक सोयीसुविधांचा अभाव असल्याने अश्या प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणा-या संस्थांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश मा. राज्यपाल महोदयांनी दिलेले आहेत. त्यास अनुसरून मा. संचालकांचे वरील संदर्भीय पत्रान्वये राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांची उपलब्ध पायाभुत व इतर शैक्षणिक सुविधांचे अनुषंगीक तपासणी करण्याच्या सुचना देण्यांत आलेल्या आहेत.

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने मुंबई विभागीय कार्यालयाच्या कार्यकक्षेतील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विविध पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी संस्थांबाबत उपलब्ध जागा, इमारत, इतर भौतिक सुविधा, मनुष्यबळ, शैक्षणिक सुविधा व उपक्रम, विद्यार्थी व उद्योगक्षेत्रांमधील उपक्रम इ. बाबींची संबंधित संस्थेने सन २०१५-१६ करीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे संस्थेतील अभ्यासक्रमांना मुदतवाढ मिळणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने तपासणी करणेसाठी संस्थानिहाय तपासणी समिती गठीत करण्यांत येत आहेत.

**सदर तपासणी समिती संबंधित संस्थेच्या प्राचार्यांशी संपर्क साधून दि. १५.६.२०१५ ते दि. २५.६.२०१५ या कालावधीत संस्थेस तपासणीचे कामी भेट देतील.**

मुंबई विभागातील सर्व संस्थांचे अध्यक्ष/सचिव/संचालक/प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यांत येते की, या कार्यालयाकडून गठीत करण्यांत आलेल्या समितीस आपल्या संस्थेतील भेटीचे वेळी संस्थेतील सोयी सुविधांच्या तपासणीचे अनुषंगाने मागणीनुसार संपुर्ण माहिती, मुळ दस्तऐवज व संबंधित कागदपत्रांच्या छायाप्रती उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

संस्थानिहाय तपासणी समितीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई-५१.